लोकमत

# मेट्रो-३ प्रकल्पाचे ४० टक्के काम पूर्ण; १७ टीबीएम कार्यरत

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे काम मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनमार्फत (एमएमआरसी) सात टप्प्यांमध्ये सुरु आहे. या प्रकल्पाच्या कामामध्ये आता सर्वच्या सर्व म्हणजेच १७ टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) कार्यरत झाल्याने भुयारीकरणाच्या कामाला वेग आला आहे. या प्रकल्पाचे ४० टक्के काम पूर्ण झाले असून एकूण ५२ किमी भुयारीकरणापैकी २५.२२ किमी म्हणजेच ४५ टक्के भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.

गोदावरी-१ यंत्राद्वारे देशांतर्गत विमानतळ स्थानकासाठी २.९ किलोमीटरच्या बोगद्याचे भुयारीकरण वेगाने सुरु आहे. हे काम ४५५ दिवसांमध्ये पूर्ण होईल, अशी अपेक्षा अहवालामध्ये व्यक्त करण्यात आली आहे. मिठी नदीखालून जाणारा बोगदा हे सर्वात महत्त्वाचे मानले जाणारे काम मेट्रो-३ प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात होणार आहे.

धारावी, आग्रीपाडा परिसरामध्ये बोगद्याच्या एकूण ७ हजार ९९२ मीटर कामापैकी ४ हजार ७४४ मीटरचे काम पूर्ण झाले आहे. वरळी आणि धारावी स्थानकाच्या परिसरातील ६ हजार २६७ मीटरचे कामही पूर्ण झाले आहे. या प्रकल्पासाठी २३ हजार १३६ कोटींचा खर्च अपेक्षित आहे. आरे कॉलनी ते वांद्रे-कुर्ला संकुल (बीकेसी) हा टप्पा २०२१ सालापर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, तर बीकेसी ते कफ परेड या टप्प्याचे काम या टप्प्याच्या नंतर करण्यात येणार आहे. या मार्गिकेच्या भुयारीकरण कामामध्ये दरदिवशी सुमारे ३१ मेट्रीक टन मातीचे उत्खनन करण्यात येत आहे.